# मुंबई विद्यापीठ

परीक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताकुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८,

क्र परीक्षा /प नि /आयसीएफ /445/ २०१५

दि. ०९, जानेवारी, २०१५

प्रति
प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित संस्था/महाविद्यालये

**विषय:-दि. २४ जानेवारी, २०१५ रोजी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्याबाबत.**
**आयोजनाविषयी चर्चा करण्याकरीता बुधवार दि. १४ जानेवारी, २०१५ रोजी सकाळी ११.३० वा मराठी भाषा भवन, विद्यानगरी, कलीना, मुंबई येथे बैठकीस उपस्थित राहण्याविषयी.**

महोदय,

मुंबई विद्यापीठाचा दिक्षांत समारोह शनिवार दि. २४ जानेवारी, २०१५ रोजी सकाळी ११.०० वा. संपन्न होणार आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदने ठरविल्या प्रमाणे त्याच दिवशी विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आयोजित करावयाचे आहे. त्या संदर्भात पुढील महत्वाच्या सुचना लक्षात घेवून त्याप्रमाणे या समारंभाचे आयोजन करावे.

१) प्रत्येक महाविद्यालयाने शनिवार दि. २४ जानेवारी, २०१५ रोजी दु. ३.०० ते सांय. ६.०० च्या दरम्यान पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करावे.

२) आपल्या महाविद्यालयातून २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या सर्व पदवी धारकांना या समारंभास उपस्थित राहण्याबाबत कळवावे.

३) या समारंभाकरीता मान्यवर व्यक्तीस प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करावे.

४) महाविद्यालयात सुरुवातीला या समारंभाची, मुंबई विद्यापीठात त्याच दिवशी सकाळी ११.०० वा संपन्न होणा-या दिक्षांत समारोहाच्या प्रमुख अतिथींच्या दिक्षांत भाषणाची चित्रफित दाखवावी त्यानंतर आपण निमंत्रित केलेल्या प्रमुख अतिथींचे मार्गदर्शन व पदवी प्रमाणपत्र वितरणाचे आयोजन करावे.

संलग्नीत महाविद्यालयात आयोजित करावयाच्या पदवी प्रमाणत्र वितरण समारंभा विषयी चर्चा करण्याकरीता मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. १४ जानेवारी, २०१५रोजी सकाळी ११.३० वा. मराठी भाषा भवन, विद्यानगरी, कलीना, मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस आपण उपस्थित रहावे ही विनंती

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक